| MHNS190002662018 | खटला दाखल दिनांक | – | १६/०२/२०१८ | | |
|---|---|---|---|---|---|
| | खटला नोंदणी दिनांक | – | १६/०२/२०१८ | | |
| | खटला निकाल दिनांक | – | २७/०४/२०२६ | | |
| | निकालाचा अवधी | – | वर्षे | महिना | दिवस |
| | | | ०८ | ०२ | ११ |

**येवला येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, यांचे न्यायालयात**

**(पिठासिन अधिकारी श्री. जे. आर. पठाण)**

**नियमित फौजदारी खटला क्र.४७/२०१८** **निशाणी क्र. ३०**

(प्रथम खबर क्र.१५१/२०१७, भा.द.वि. कलम ३५४–अ,५०४, ५०६ प्रमाणे )

| | |
|---|---|
| अभियोगपक्ष | **महाराष्ट्र शासन**<br>तर्फे येवला शहर पोलीस ठाणे येवला, ता. येवला, जि. नाशिक. |
| तर्फे | सहायक सरकारी अभियोक्ता श्री. सी. डी. लोढा |
| आरोपी | **१. संजय सिताराम खोकले,**<br>वय– ४० वर्षे<br>रा. आडगांव चोथवा शिवार, ता. येवला, जि. नाशिक. |
| तर्फे | विद्वान विधीज्ञ श्री. के. टी. पगारे. |

| | |
|---|---|
| घटना घडल्याची तारीख | ११/१२/२०१७ |
| प्रथम खबर दिनांक | १४/१२/२०१७ |
| दोषारोपपत्र दाखल केल्याचा दिनांक | १६/०२/२०१८ |
| न्यायालयाने दोषारोप निश्चीत केल्याचा दिनांक | ३०/१२/२०१९ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | ३०/१२/२०१९ |
| न्यायनिर्णय राखुन ठेवल्याचा दिनांक | –– |

| | |
|---|---|
| न्यायनिर्णय दिनांक | २७/०४/२०२६ |
| शिक्षेच्या आदेशाची तारीख, जर असेल तर | -- |

## आरोपींचा तपशिल

| अ. क्र. | आरोपीचे नाव | अटक केल्याचा दिनांक | जामिनावर मुक्त केल्याची तारीख | गुन्हयाची कलमे | आरोपीस शिक्षा करण्यात आली किंवा निर्दोष ठरविण्यात आले. | देण्यात आलेली शिक्षा | फौ. प्र. सं. कलम ४२८ करीता संपरिक्षेदरम्यान आरोपीने कारागृहात घालविलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | संजय सिताराम खोकले | १६/१२/२०१७ | १६/१२/२०१७ | भा. द. वि. कलम ३५४-अ, ५०४, ५०६ प्रमाणे | निर्दोष | -- | -- |

**अभियोगपक्ष /बचावपक्ष/न्यायालयीन साक्षीदार यांची यादी**

**अ. अभियोगपक्षः**

| क्रमांक | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| | | साक्षीदार ) |
| स.सा.१ | मनिषा प्रविण खोकले (नि.क्र.१९) | फिर्यादी |
| स.सा.२ | प्रविण ठकाजी खोकले (नि.क्र.२१) | साक्षीदार |

**ब. बचावपक्षाचा साक्षीदारः निरंक.**

**क. न्यायालयीन साक्षीदारः निरंक.**

**अभियोगपक्ष /बचावपक्ष/न्यायालयीन साक्षीदार निशाणी यादीः**

**अ. अभियोगपक्षः**

| अ. क्रं | निशाणी क्रंमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | निशाणी क्र.२० | फिर्यादवरील सही |

**ब. बचावपक्ष : निरंक.**

**क. न्यायालययीन निशाणीः निरंक.**

**ड. मुद्देमालः**

| अ. क्रं | मुद्देमालाचे वर्णन | आर्टीकल क्र. /जी.एम. आर. क्रमांक |
|---|---|---|
| १. | निरंक | |

## न्यायनिर्णय

## (घोषित दि.२७/०४/२०२६)

प्रस्तुत प्रकरणातील आरोपींविरुध्द भारतीय दंड विधानचे कलम ३५४–अ, ५०४ , ५०६ अन्वये भारतीय दंडविधान संहिता (यापुढे भा.दं.वी. असे संबोधले जाईल) अन्वये दोषारोप ठेवण्यात आले आहेत.

**अभियोग पक्षाचे कथन थोडक्यात खालील प्रमाणे आहे–**

२. घटना दि. ११/१२/२०१७ रोजी दुपारी १५.०० वाजताच्या सुमारास आडगाव शिवारात, फिर्यादीचे शेतगट नं. १९७ मध्ये ता. येवला, जि. नाशिक येथे घडली. फिर्यादी ही वाटेत त्याचे शेतात मेथीची भाजी उपटत असतांना आरोपीने तिचे पाठीमागुन येउन तिचा हात धरुन तिला लज्ञा उत्पन्न होईल असे वर्तन करुन फिर्यादीचा साडीचा पदर ओढुन तसेच ब्लाउज ओढुन तु मला आवडते, तु माझे सोबत चल असे म्हणुन अंगलट करुन तिची छेडछाड करुन विनयभंग केला व फिर्यादी तिचे घरी गेली असता आरोपीने तिचे घरी जावुन फिर्यादीस म्हणाला की, तु माझे सोबत आली नाहीतर मी तुला मारुन टाकीन अशी दमदाटी केली, शिवीगाळ केली म्हणुन सदरची फिर्याद आरोपींविरुध्द दाखल केली.

३. सदर फिर्यादीच्या अनुषंगाने येवला शहर पोलीस स्टेशन, येवला, ता. येवला, जि. नाशिक येथे गु.र.क्र. १५१/२०१७, भा.द.वि कलम ३५४–अ, ५०४ , ५०६ प्रमाणे गुन्हयाची आरोपीं विरुध्द नोंद झाली. तपासीक अंमलदार पोलीस हवालदार बा. बा. कांदळकर यांनी त्यांचे तपासाअंती आरोपीं विरुध्द पुरावा मिळून आल्याने न्यायालयात दोषारोपत्र दाखल केले.

४. न्यायालयात आरोपींची उपस्थिती संपादीत करुन निशाणी क्र. १० अन्वये भारतीय दंड विधानाचे कलम ३५४–अ, ५०४, ५०६ प्रमाणे आरोपीविरुध्द दोषारोप ठेवण्यात आला. दोषारोपातील मजकुर सर्व आरोपीला वाचुन दाखविण्यात आला. त्याअन्वये आरोपीने गुन्हा ना कबुल केला व संपरीक्षेची मागणी केली. आरोपीचे गुन्हा नाकबुलीचे निवेदन नि.क्र. ११ वर आहे.

५. आरोपीं विरुध्द गुन्हयात गोवणारा पुरावा न आल्यामुळे त्याचे कलम ३१३ (१) (ब) फौजदारी प्रक्रिया संहिता प्रमाणेचे बयान नि.क्र.१ अन्वयेच्या

आदेशाने नोंदविण्यात आले नाही.

६. अभिलेखाचे अवलोकन केले असता, न्यायनिर्णयाकरिता खालील मुद्दे माझ्या निष्कर्षासाठी उपस्थित होतात व त्यावरील निष्कर्ष मी कारणांसह देत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | दि.११/१२/२०१७ रोजी १५.०० वाजेच्या सुमारास फिर्यादीचे शेत गट नं. १९७ मध्ये, मौजे आडगाव चौथवा शिवार, ता. येवला, जि. नाशिक येथे आरोपीने समान हेतूने येथे आरोपीने फिर्यादीचे पाठीमागे जाउन तिचा हात धरला, तिचा साडीचा पदर ओढला व तिचेशी अंगलट करुन छेडछाड केली व तिचे मनास लज्जा वाटेल असे कृत्य केले व तिचा विनयभंग केला व त्यानुसार त्यांनी भारतीय दंड विधान कलम ३५४(अ) प्रमाणे गुन्हा केल्याचे अभियोगपक्षाने सिध्द केले काय ? | **नकारार्थी** |
| २. | वरील दिनांक, वेळ व ठिकाणी आरोपीने फिर्यादीस शिवीगाळी केली व तिचा अपमान केला, त्यामुळे त्याच्याकडून शांततेचा भंग व्हावा किंवा अन्य कोणताही अपराध घडावा असा त्यामागचा उद्देश होता व त्यानुसार त्यांनी भारतीय दंड विधान कलम ५०४ प्रमाणे गुन्हा केल्याचे अभियोगपक्षाने सिध्द केले काय? | **नकारार्थी** |
| ३. | वरील दिनांक, वेळ व ठिकाणी आरोपीने फिर्यादीस दमदाटी केली व त्यानुसार त्यांनी भारतीय दंड विधान कलम ५०६ प्रमाणे गुन्हा केल्याचे अभियोगपक्षाने | **नकारार्थी** |

| | | |
|---|---|---|
| | सिध्द केले काय? | |
| ४. | हुकूम काय? | **आरोपींना निर्दोष मुक्त करण्यात येते.** |

## – कारणमीमांसा –

**मुद्दा क्र. १ ते ३ करीता** :–

७. मुद्दा क्र.१ ते ४ हे एकमेकांशी संलग्नीत असल्याने चर्चेची पुनरावृत्ती टाळण्याकरीता त्यांना एकत्र चर्चेस घेत आहे. अभियोगपक्षाने आरोपीं विरुध्दचे दोषारोप शाबीत करण्याकरीता फिर्यादी मनिषा प्रविण खोकले (स.सा.क्र.१) हिस तपासले. फिर्यादीने तिचे सरतपासात सांगितले की, ती आरोपी संजयला ओळखते. तो तिचे भावकीतील आहे. २०१७ साली तिच्या शेतात आरोपी व त्यांचे किरकोळ भांडण झाले होते. ते शेतात एकटी असतांना आरोपीने संजयने तिला हात दाखवुन बोलावले होते. ते गेली नाही. त्यानंतर ती घरी आली. तिने पतीला घटना सांगितली. घरी आल्यावरही तिचे व आरोपीचे भांडण झाले. त्यानंतर ती पोलीस स्टेशनला गेली होती. तिने पोलीस ठाण्याला तक्रार केली होती. फिर्यादीस अभिलेखावरील फिर्याद दाखविली असता त्याने त्यावरील सही त्याची असल्याचे मान्य केले, परंतु त्यातील मजकुर त्याला माहित नसल्याचे सांगीतले आहे. तिने आरोपीला न्यायालयात ओळखले. सदर साक्षीदार अभियोग पक्षास सहाय्य करीत नसल्यामुळे अभियोगपक्षाने उलटतपासामध्ये प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली असता तशी ती त्यांना देण्यात आली. परंतु, त्यामधून देखील आरोपींविरुध्द गुन्हा शाबीत होईल आणि अभियोग पक्षास सहाय्यभूत ठरेल असे काहीही अभिलेखावर आलेले नाही. उलटपक्षी, आरोपी

व ते एकमेकांचे भाउबंद असल्याने व त्यांच्या शेतजमीनी एकमेकांना लागुन असलयाने त्यांनी व आरोपीची कोर्टाबाहेर तडजोड झाली असुन त्यांचे भांडण मिटले आहे असे सांगितले.

८. प्रविण ठकाजी खोकले (स.सा.क्र.२) यास तपासले असता त्याने सरतपासात सांगितले की, फिर्यादी त्याची पत्नी आहे. आरोपी त्याची भावकी असुन त्याला तो ओळखतो. घटना २०१७ साली होती. तो त्यादिवशी कामावर गेला होता. त्या दिवशी त्याची पत्नी त्यांचे शेतात भाजी काढत होती. तेव्हा आरोपीने तिला हात करुन बोलावण्यासाठी इशारा केला होता. तो संध्याकाळी घरी आल्यानंतर पत्नीने सगळी घटना सांगितली होती. तो आरोपीला विचारायला गेला होता. आरोपीने घटना नाकारली होती. त्याने त्याचे वडीलांना घटना फोन करुन सांगितली. वडील म्हणाले की, ते गावावरुन घरी आल्यानंतर पाहु. वडील दुस–या दिवशी घरी आले. त्यानंतर त्यांनी दुस–या दिवशी पोलीस स्टेशनला फिर्याद द्यायला गेले. तिथे त्याचे पत्नीने फिर्याद दिली होती. घटनेबाबत पोलीसांनी त्याचेकडे चौकशी केली होती. त्याने आरोपीला न्यायालयात ओळखले. सदर साक्षीदार अभियोग पक्षास सहाय्य करीत नसल्यामुळे अभियोगपक्षाने उलटतपासामध्ये प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली असता तशी ती त्यांना देण्यात आली. परंतु, त्यामधून देखील आरोपींविरुध्द गुन्हा शाबीत होईल आणि अभियोग पक्षास सहाय्यभूत ठरेल असे काहीही अभिलेखावर आलेले नाही. उलटपक्षी, आरोपी व ते एकमेकांचे भाउबंद असल्याने व त्यांच्या शेतजमीनी एकमेकांना लागुन असलयाने त्यांनी व आरोपीची कोर्टाबाहेर तडजोड झाली असुन त्यांचे भांडण मिटले आहे असे सांगितले.

९. प्रस्तुत प्रकरणामध्ये अभियोगपक्षातर्फे तपासलेल्या फिर्यादीचे

पुराव्याचे काळजीपूर्वक अवलोकन केले. प्रस्तुत प्रकरणामध्ये फिर्यादी पुराव्यादरम्यान फिर्यादमधील मजकूराबाबत अनभिज्ञता दर्शविली आहे. त्यामुळे फिर्यादीचा पुरावा फिर्याद शाबीत करण्याकरिता उपयुक्त नाही. अभियोगपक्षाने फिर्याद शाबीत करण्याकरिता इतर कोणताही सक्षम साक्षीदार तपासलेला नाही. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणातील फिर्याद शाबीत झालेली नाही.

१०. प्रस्तुत प्रकरणामध्ये आरोपींविरुध्द भा.द.वि. कलम ३५४–अ, ५०४, ५०६ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. अभियोगपक्षातर्फे तपासलेल्या स्वःता फिर्यादीने आरोपीने तिची छेड काढली, तिचा हात धरला, तिचा साडीचा पदर ओढला व तिला लज्ञा उत्पन्न होईल असे कृत्य केले याबाबत काहीही सांगिले नाही. त्यामुळे सदर फिर्यादीचा पुरावा आरोपींविरुध्द दोषारोप ठेवलेला गुन्हा शाबीत करण्याकरिता उपयुक्त नाही. याठिकाणी हे नमूद करणे जरुरीचे की, अभियोगपक्षाने आरोपीने फिर्यादीस छेड काढली व हात धरला लज्ञा उत्पन्न होईल असे कृत्य केले आहे असा आरोप केला आहे. परंतु फिर्यादीने तिला छेड काढली व हात धरला असे कोणतेही कथन केले नाही. एकंदरीत सर्व परिस्थिती व पुरावा विचारात घेता आरोपीने फिर्यादीला लज्ञा उत्पन्न होईल असे कृत्य करुन शिवीगाळ करुन दमदाटी केली हे शाबीत करण्यास अपयश आलेले आहे.

११. उपरोक्त सर्व कारणमीमांसा ध्यानात घेता अभियोगपक्षाने आरोपींविरुध्द दोषारोप ठेवलेल्या गुन्हयाचे मुलभूत घटक शाबीत केलेले नाहीत म्हणून असा निष्कर्ष काढण्यात येतो की, आरोपींनी भा.द.वि. कलम ३५४–अ, ५०४, ५०६ प्रमाणे गुन्हा केलेला आहे ही बाब शाबीत करण्यास अभियोगपक्षास अपयश आलेले आहे. त्यामुळे मी मुद्दा क्र.१ ते ३ करिता नकारार्थी निष्कर्ष देत आहे.

**मुद्दा क्र.४ साठी**

१२. फौजदारी प्रकरणामध्ये आरोपीचा गुन्हा शाबीत करण्याची जबाबदारी अभियोगपक्षाची असते. परंतु प्रस्तुत प्रकरणामध्ये आरोपींचा गुन्हा शाबीत करण्याकरिता अभियोगपक्षाने प्रत्यक्षदर्शी असा सबळ पुरावा अभिलेखावर आणलेला नाही. त्यामुळे मुद्दा क्र.१ ते ३ वर नोंदविलेले निष्कर्ष व त्यावरील कारणमीमांसा ध्यानात घेता, अभियोगपक्षाने आरोपींविरुध्द दोषारोप ठेवलेले गुन्हे सिध्द केलेले नाहीत. त्यामुळे आरोपींना निर्दोष मुक्त करणे गरजेचे आहे. सबब मुद्दा क्र. ४ करीता मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

**१.** आरोपी नामे **संजय सिताराम खोकले** याची भारतीय दंड विधान कलम ३५४–अ, ५०४ व ५०६ अन्वयेचे गुन्ह्यांतून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) नुसार निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

**२.** आरोपींचे जामीन व कदबे रद्द करण्यात येत आहेत.

**३.** आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४३७–अ नुसार जामीनाची पुर्तता केली आहे.

[न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात टंकलिखीत व जाहीर करण्यात आला.]

PATHAN JAHANGIR RASHEED

Digitally signed by PATHAN JAHANGIR RASHEED
Date: 2026.04.27 17:18:50 +0530

दिनांकः– २७/०४/२०२६ (जहांगीर आर. पठाण)

स्थळः– येवला. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, येवला,जि. नाशिक.

**प्रमाणपत्र**

मी असे प्रमाणित करतो की, या PDF न्यायनिर्णयामधील मजकूर शब्द न शब्द मुळ न्यायनिर्णया प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | लघुलेखकाचे नाव | : | श्री. व्ही. एस. शेलार, लघुलेखक श्रेणी–३ |
| २ | न्यायालयाचे नांव | : | श्री. जे. आर. पठाण, न्यायदंडाधिकारी, प्र.वर्ग, येवला, जि. नाशिक. |
| ३ | न्यायनिर्णय व आदेशाची तारीख | : | २७/०४/२०२६ |
| ४ | पिठासीन अधिकारी यांनी सही केलेले न्यायनिर्णयाची तारीख | : | २७/०४/२०२६ |
| ५ | न्यायनिर्णय PDF अपलोड केल्याची तारीख | | २७/०४/२०२६ |